**MHKO120001722020**

# निशाण क्रमांक ०५ वरील आदेश.

( नामदेव गुरव वि. महादेव देसाई )

वादीने सदर अर्ज प्रतिवादीविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १, सह कलम १५१ अन्वये तूर्तातूर्त मनाईकरीता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

०२. मौजे कडगांव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील जमीन गट क्र. १७, क्षेत्र हे. ०-१८ आर., आकार रु. ०-३७ पै. पैकी हिस्सा हे.०.०१.६८ आर, ह्या मधील पाटगाव रस्त्यावरील चालू ग्रामपंचायत मिळकत क्र.९१३ मधील २८ X ३० (८४० चौ. फूट ) क्षेत्रातील शेड सह दावा मिळकत. चतुःसीमा पूर्वस - कडगांव पाटगाव रोड, पश्चिमेस - शाळा इमारत, दक्षिणेस – सह-हिस्सेदर खंडेराव देसाई यांची मिळकत, उत्तरेस - प्रतिवादी यांची मिळकत व त्यापलीकडे भरत देसाई व रविंद्र देसाइ यांची मिळकत ('' **दावा मिळकत** '' संक्षिप्त करिता)

**थोडक्यात वादीचे कथन पुढील प्रमाणे,**

०३. दावा मिळकत ही प्रतिवादीचे मयत वडील गोविंद देसाई यांच्या मालकीची होती. सदर मिळकत वादीने दिनांक २२/०८/१९३ रोजी पूर्ण मोबदला देवून कायम खुष खरेदी घेतलेली आहे. तेंव्हापासून दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे. त्यानुसार फेरफार क्र.३३१ दिनांक ०७/०१/१९८४ नुसार दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादीच्या नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकतीशी प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. असे असताना, प्रतिवादीने वादीच्या नावे मंजूर झालेल्या फेरफार क्र.३३१ बाबत वाद निर्माण करून महसूल न्यायालयात वाद दाखल केले आहे. सदरेच काम प्रलंबित असताना, प्रतिवादीने वादीच्या संमतीविना दावा

मिळकतीमध्ये २८ X ३० पूट क्षेत्राचे कच्चे शेड अनाधिकाराने व बेकायदेशीररीत्या उभारले आहे व त्याची नोंद ग्रामपंचायत घरठाणपत्रकामध्ये केलेली आहे. याबाबत वादींनी ग्रामपंचायतीकडे विचारणा केली असता त्यांनी संदिग्ध उत्तरे दिली आहेत. तसेच, प्रतिवादी हे सदरच्या पोकळ नोंदीच्या आधारे दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करण्याच्या तयारीत असल्याचे वादीला समजून आले आहे. सबब, त्यांनी सदर दावा दाखल केला आहे व प्रस्तुत अर्जाद्वारे त्यानी प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या स्वरूपात कोणताही बदल करून नये व दावा मिळकतीवर कर्ज, गहाण, तबदील, विक्री किंवा त्रयस्थाचे अधिकार निर्माण करू नयेत असा तूर्तातूर्त मनाई आदेश होण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादीने निशाणी क्रमांक १७ वर तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. थोडक्यात प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या वडिलांच्या मालकीची आहे. त्यांनी कधीही दावा मिळकतीचा व्यवहार वादीशी केलेला नव्हता. याबाबत वादीने दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र.०१/१९९२ मधील न्यायनिर्णयावर प्रतिवादींनी दाखल केलेले अपील क्र.५५९/१९९६ मंजूर करण्यात आले आहे. दावा मिळकतीमध्ये केंव्हाही वादीची कब्जेवहिवाट नव्हती व नाही. प्रतिवादी हेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हा त्यांच्या पूर्वहक्कदारांपासून मालकी हक्काने कब्जे वहिवाटस होता व आहे. त्यामुळे प्रतिवादीने फेरफार क्र.३३१ बाबत महसूल न्यायालयात आदेशाविरुद्ध प्रतिवादीने उपजिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले आहे. त्यामुळे, वादीचा तूर्तातूर्त मनाई अर्ज चालण्यास पात्र नाही व तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

०५. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. पाटील तसेच प्रतिवादी तर्फे विधिज्ञ जी. टी. ठाकूर यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय ? | : | नकारार्थी. |
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | नकारार्थी. |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल काय ? | : | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

# कारणमिमांसा

०६. प्रस्तुत प्रकरणी वादी व प्रतिवादी यांच्या मार्फत दाखल करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी घेण्यात आला आहे.

**प्रश्नबिंदु क्रमांक १ ते ४ करिता, ( प्रथमदर्शनी केस, सोईचा समतोल, अपरिमित नुकसान व आदेश )**

०७. प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडित असल्यामुळे त्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेसाठी एकत्रात घेण्यात आले आहेत.

१०. सकृतदर्शनी केस बघताना न्यायालयास एक गंभीर व प्रामाणिक वाद दाव्याच्या न्यायचौकशी करिता उपस्थित करण्यात आला आहे काय? हे तपासावे लागते. सकृतदर्शनी केस सिद्ध करण्याकरिता वादीस दाव्याच्या गुणदोषावर सिद्ध करावयाची केस सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत अर्जावर विचार करताना न्यायालय अभिलेखावर दाखल शपथपत्र व इतर कागदोपत्री पुरावा त्यांच्या औपचारिक सिद्धतेशिवाय विचारात घेवू शकतो.

०८. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. पाटील, यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या वडिलांच्या मालकीची होती व ती वादीने दिनांक

२२/०८/१९३ रोजी पूर्ण मोबदला देवून कायम खुष खरेदी घेतलेली आहे. तेंव्हापासून दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे. त्यानुसार फेरफार क्र.३३१ दिनांक ०७/०१/१९८४ नुसार दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादीच्या नावाची नोंद झालेली आहे. त्यानंतर, प्रतिवादीने वादीच्या नावे मंजूर झालेल्या फेरफार क्र.३३१ बाबत वाद निर्माण करून महसूल न्यायालयात वाद दाखल केले आहे. सदरेच काम प्रलंबित असताना, प्रतिवादीने वादीच्या संमतीविना दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीररीत्या शेड उभारले आहे व त्याची नोंद ग्रामपंचायत घरठाणपत्रकामध्ये केलेली आहे. तसेच, प्रतिवादी हे सदरच्या पोकळ नोंदीच्या आधारे दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करण्याच्या तयारीत आहेत.

०९. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. जी. टी. ठाकूर, यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या वडिलांच्या मालकीची आहे व त्यांनी कधीही दावा मिळकतीचा व्यवहार वादीशी केलेला नव्हता. याबाबत वादीने दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र.०१/१९९२ मधील न्यायनिर्णयावरील प्रतिवादींनी दाखल केलेले दिवाणी अपील क्र.५५९/१९९६ मंजूर करण्यात आले असून दिवाणी दावा क्र.०१/१९९२ रद्द करण्यात आला आहे. दावा मिळकतीमध्ये केंव्हाही वादीची कब्जेवहिवाट नव्हती व नाही. प्रतिवादी हेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हा त्यांच्या पूर्वहक्कदारांपासून मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस होता व आहे. त्यामुळे प्रतिवादीने फेरफार क्र.३३१ बाबत महसूल न्यायालयात आदेशाविरुद्ध प्रतिवादीने उपजिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले आहे. तसेच, वादीने दोन्ही पक्षकारांमध्ये पूर्वी दाखल असणाऱ्या दाव्याची व अपिलाची माहिती दिलेली नाही. यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१०. मान्य परिस्थीतीनुसार, वादी व प्रतिवादींचे वडील यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.०१/१९९२ हा दाखल होवून तो मंजूर ला होता. सदर दाव्याच्या विरोधात प्रतिवादींनी दिवाणी अपील क्र.५५९/१९९६ हे दाखल केले होते. सदरेच अपील मंजूर होवून दाव्याचा निकाल रद्द करण्यात आला आहे. सदरचे कथन हे या दाव्यातील महत्त्वपूर्ण कथन आहे. परंतु वादीने आपल्या दाव्यामध्ये सदरचे महत्त्वपूर्ण कथन नमुद

केले नाही. सदरचे महत्त्वपूर्ण कथन वादीने का नमूद केले नाही ? याचे कारण देखील अभिलेखावर नाही. या न्यायालयाने निशाणी क्र.०१ खाली दिनांक ०५/०१/२०२३ रोजी आदेश पारित करून वादींना दिवाणी दावा क्रमांक ०१/१९९२ ची प्रत दाखल करण्याबाबत सूचित केले होते. सदरच्या वादीच्या वर्तणुकीवरून असे न्यायालयाच्या निदर्शनास येते की, वादीने दाव्यासंबंधीची महत्त्वपूर्ण माहिती न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. जर एखादा पक्षकार न्यायालयापासून एखादी दाव्यासंबंधीची महत्त्वपूर्ण माहिती माहीत असून देखील न्यायालयास सांगत नसेल तर तो कोणत्याही विनंती हक्कदार नाही. माहिती लपवून ठेवणे म्हणजे, वादी हा स्वच्छ हेतूने न्यायालयात आलेला नाही. जर, वादी हा स्वच्छ हेतूने न्यायालयात आला नसेल तर तो कोणत्याही विनंतीस पात्र नाही. त्यामुळे, वादी हा सद्यःस्थितीमध्ये कोणत्याही त्याने केलेल्या विनंतीस पात्र नाही. परिणामतः मी प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ यांना नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.02.16 18:19:09 +0530

स्थळ : गारगोटी. ( **व्ही. बी. मुल्ला** )

दिनांक : १६/०२/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.